## <u>नियमीत दिवाणी दावा क्र. ४५/२०१२ मधील निशाणी २९६ खालील आदेश.</u>

१. निशाणी २९६ वरील अर्ज वादीने प्रतिवादी क्र. ८ चे वारस रेकॉर्डवर घेण्यासाठी झालेला उशीर माफ करुन मिळावा यासाठी दाखल केलेला आहे.

**<u>प्रस्तुत अर्जातील वादीचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे–</u>**

२. प्रतिवादी क्र. ८ लतिका हणमंत जाधव या दिनांक ०६/०५/२०२१ रोजी मयत झाल्या. सदरकामी मुदतीत मयत प्रतिवादी क्र. ८ चे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक होते. परंतु वादीला कायद्याचे ज्ञान नाही. त्यामुळे वादीला वारस रेकॉर्डवर घेण्याची माहीती नव्हती. अज्ञानामुळे याबाबतची माहीती वादीने वकीलांना दिली नाही. त्यामुळे सदरील प्रतिवादी क्र. ८ चे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेता आले नाहीत. वादी यांनी सदरचा झालेला १ वर्ष ३ महीणे ११ दिवसांचा विलंब हा जाणुन बुजुन केलेला नाही. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर व्हावा अशी विनंती वादी तर्फे करण्यात आली.

३. प्रतिवादी क्र. ८ चे वारसांनी योग्य ते न्यायाचे आदेश व्हावेत अशी विनंती केली आहे.

४. अर्ज वाचला, कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादींचा युक्तीवाद ऐकला.

६. वादीचे दाखल कागदपत्रावरुन प्रतिवादी क्र. ८ लतिका हणमंत जाधव या दिनांक ०६/०५/२०२१ रोजी मयत झाल्याचे दिसुन येते. वादी यांनी सदरचा दावा हा वाटपासाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुतचे प्रकरण हे स्थावर मिळकतीबाबत आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ८ यांचे सर्व वारसांच्या विरुध्द सदर प्रकरण चालविण्याचा

अधिकार पुढे चालु राहतो. प्रस्तुत प्रकरणात वादीने केलेल्या कथनांवरुन त्यास मुदतीत वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत असे कथन केले आहे. सदर नमूद कारणामध्ये तथ्य दिसुन येते. प्रतिवादी क्र. ८ चे वारस रेकॉर्डवर घेतल्यामुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दाव्याचा गुणदोषावर निकाल लागण्यासाठी प्रतिवादी क्र. ८ चे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज रक्कम रुपये २००/- (दोनशे रुपये फक्त) रुपयाच्या खर्चावर मंजूर करण्यात येतो. खर्चाची रक्कम सरकार जमा करावी.

२. वादींना प्रतिवादी क्र. ८ चे वारस रेकॉडवर घेण्यास झालेला उशीर माफ करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by ATUL BHIMRAO PATIL
Date: 2023.01.31 14:58:50 +0530

कोरेगाव.

दि. ३१/०१/२०२३

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर कोरेगाव.